# पुणे शहरातील शाळांमध्ये विविध खेळासाठी खेळाडूंची निवड करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतींचा अभ्यास

**पाटील रवींद्र मधुकर**
संशोधक, आगाशे महाविद्यालय, पुणे
**डॉ. अमीत प्रभू**
सहयोगी प्राध्यापक (आगाशे महाविद्यालय, पुणे)

## सारांश

*शारीरिक शिक्षण आणि खेळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहेत. शालेय स्तरावर खेळाडूंची निवड करताना शारीरिक तंदुरुस्ती, कौशल्ये, मानसिक तयारी आणि इतर निकषांचा विचार केला जातो. या अभ्यासाचा उद्देश पुणे शहरातील शाळांमध्ये खेळाडू निवड प्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतींचे सखोल विश्लेषण करणे हा आहे. संशोधनासाठी पुणे शहरातील ३१ शारीरिक शिक्षण शिक्षकांचा नमुना घेण्यात आला. डेटा संकलनासाठी प्रश्नावली ( स्वरूपात) वापरण्यात आली आणि एक्सेल सॉफ्टवेअरच्या मदतीने सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. संशोधनातून असे आढळले की ८३.८७% शाळांमध्ये खेळाडूंच्या शारीरिक तंदुरुस्तीला प्राधान्य दिले जाते, ८३.८७% शाळांमध्ये कौशल्य चाचणी घेतली जाते, ७४.१९% शाळांमध्ये मानसिक तयारीचा विचार केला जातो, तर फक्त १९.३५% शाळांमध्ये शैक्षणिक कार्यप्रदर्शन देखील निकष म्हणून समाविष्ट असते. याशिवाय, ९०.३२% शाळांमध्ये उंची आणि वजन मापन चाचणी घेतली जाते, ८७.१०% शाळांमध्ये १० ४ मीटर शटल रन आणि ८३.८७% शाळांमध्ये स्टँडिंग ब्रॉड जम्प घेतली जाते. परंतु, मानसिक तयारी आणि कौशल्य चाचण्यांमध्ये अद्याप वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव दिसतो.*

*या अभ्यासाच्या निष्कर्षांवरून असे सुचवता येते की, शालेय खेळाडू निवड प्रक्रियेत वैज्ञानिक पद्धतींचा अधिकाधिक समावेश करणे आवश्यक आहे. शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच कौशल्य आणि मानसिक तयारीच्या आधुनिक चाचण्या घेणे, पारदर्शक निवड प्रक्रिया ठेवणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. जर निवड प्रक्रियेत सुधारणा केली तर भविष्यात अधिक गुणवंत आणि स्पर्धात्मक खेळाडू घडविता येतील.*

***महत्वाच्या सज्ञा :*** संज्ञाः शारीरिक शिक्षण, खेळाडू निवड प्रक्रिया, शाळा क्रीडा धोरण, क्रीडा विकास, प्रशिक्षण पद्धती.

## प्रस्तावना

शारीरिक शिक्षण हे एक महत्त्वाचे शिक्षण क्षेत्र असून, त्याचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला गती देणे हा आहे. केवळ शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठीच नव्हे, तर मानसिक आणि सामाजिक कौशल्यांचा विकास घडवण्यासाठीही शारीरिक शिक्षण अत्यावश्यक आहे. यामध्ये खेळ, व्यायाम, योग, ध्यानधारणा, शिस्त, आणि संघभावना यांसारख्या मूल्यांचा समावेश होतो. आजच्या आधुनिक काळात, विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धा आणि शाळा स्तरावरील निवड प्रक्रिया राबविल्या जातात.

पुणे शहर हे शैक्षणिक आणि क्रीडा दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे केंद्र मानले जाते. येथे अनेक प्रतिष्ठित शाळा आणि महाविद्यालये आहेत, जिथे विद्यार्थ्यांना विविध खेळांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. खेळाडू निवड प्रक्रियेत गुणवत्ता आणि प्रतिभेचा योग्य प्रकारे शोध घेणे गरजेचे असते. योग्य पद्धती आणि मोजमाप प्रणालीचा अवलंब करून विद्यार्थ्यांची निवड केल्यास त्यांच्या कार्यक्षमतेत अधिक सुधारणा करता येऊ शकते. खेळाडूंची निवड करताना त्यांची कौशल्ये, शारीरिक क्षमता, मानसिक तयारी, आणि खेळाविषयी असलेली जाणीव यांचा विचार केला जातो. या संशोधनाचा उद्देश पुणे शहरातील शाळांमध्ये खेळाडूंच्या निवडीसाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतींचा अभ्यास करणे आहे. खेळाडू निवड प्रक्रियेत कोणते निकष लावले जातात, कोणत्या कसोट्या घेतल्या जातात, आणि निवडीसाठी कोणते तंत्रज्ञान किंवा साधने वापरली जातात यावर हा अभ्यास केंद्रित आहे. तसेच, निवड प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना शोधण्यावरही या संशोधनाचा भर आहे. शारीरिक शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. खेळाडूंच्या कामगिरीचे विश्लेषण, त्यांच्या हालचालींचे मापन आणि त्यांची क्षमता तपासण्यासाठी विविध वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब केला जातो. अशा संशोधनातून खेळाडू निवड प्रक्रियेत सुधारणा घडवून आणता येऊ शकते आणि भविष्यातील संभाव्य खेळाडूंना अधिक चांगली संधी उपलब्ध करून देता येते.

या संशोधनाचा उपयोग शाळा प्रशासन, प्रशिक्षक, आणि शारीरिक शिक्षणतज्ज्ञांसाठी उपयुक्त ठरेल. यामुळे विद्यार्थ्यांच्या क्रीडा प्रतिभेचा योग्य प्रकारे विकास होण्यास मदत होईल आणि खेळाचा स्तर उंचावण्यासाठी नविन धोरणे आखता येतील.

## अभ्यासाचा उद्देश

पुणे शहरातील शाळांमध्ये खेळाडू निवड प्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धतींचे विश्लेषण करणे.

## संशोधन पद्धत

संकलनासाठी संरचित प्रश्नावलीचा (Structured Questionnaire) वापर करण्यात आला, ज्यामध्ये मिश्र पद्धत (Mixed Method) म्हणजेच संख्यात्मक (Quantitative) आणि गुणात्मक (Qualitative) प्रश्न समाविष्ट होते. संख्यात्मक प्रश्नांद्वारे खेळाडू निवड प्रक्रियेशी संबंधित प्रतिक्रियांची टक्केवारी आणि वारंवारता विश्लेषण करण्यात आले, तर गुणात्मक प्रश्नांमधून थीमॅटिक विश्लेषण (Thematic Analysis) करून खेळाडूंच्या निवड प्रक्रियेतील महत्त्वाचे मुद्दे समोर आले. संशोधनासाठी नमुना (Sample) म्हणून पुणे शहरातील शाळांतील शारीरिक शिक्षण शिक्षक व प्रशिक्षक यांची निवड करण्यात आली. एकूण ३१ प्रतिसादांचे विश्लेषण करून संशोधन निष्कर्ष मांडण्यात आले. संकलित डेटाचे वर्णनात्मक विश्लेषण ((Descriptive Analysis), टक्केवारी गणना (Percentage Analysis), आणि थीमॅटिक विश्लेषण करण्यात आले.

## माहिती विश्लेषण आणि अर्थ

संशोधनात शालेय खेळाडू निवड प्रक्रियेच्या विविध पैलूंचे विश्लेषण करण्यात आले आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक माहितीच्या आधारे निवड प्रक्रियेसंबंधी महत्त्वाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

प्रश्नावलीद्वारे गोळा केलेल्या प्रतिसादांचे वर्णनात्मक विश्लेषण (Descriptive Analysis) आणि टक्केवारी गणना (Percentage Analysis) करण्यात आले आहे. तर गुणवत्तापूर्ण प्रतिसादांचे थीमॅटिक विश्लेषण (Thematic Analysis) करण्यात आले आहे. या अभ्यासात निवड प्रक्रियेची वेळ, निकष, प्राथमिक चाचण्या, शारीरिक तंदुरुस्तीचे निकष, कौशल्य मूल्यांकन पद्धती आणि निवड प्रक्रियेतील समावेशकता यांचा आढावा घेण्यात आला आहे. प्रत्येक घटकाविषयी सविस्तर माहिती खालील विश्लेषणात मांडण्यात आली आहे.

**कोष्टक १ :** शालेय खेळाडू निवड प्रक्रियेच्या वेळेसंबंधी विश्लेषण

| निवड प्रक्रिया कधी होते | उत्तरांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला | २६ | ८३.८७ |
| शैक्षणिक वर्षाच्या मधोमध | ५ | १६.१३ |
| शैक्षणिक वर्षाच्या शेवटी | ५ | १६.१३ |

अधिकांश शाळांमध्ये शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला (८३.८७%) निवड प्रक्रिया केली जाते, जेणेकरून विद्यार्थ्यांना पुरेसा सराव व स्पर्धेची तयारी करता येईल. १६.१३% शाळांमध्ये निवड प्रक्रिया वर्षाच्या मधोमध आणि शेवटी होते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना कमी वेळ मिळतो. नियोजनबद्ध निवड प्रक्रियेमुळे खेळाडूंना नियमित प्रशिक्षणाचा लाभ मिळू शकतो.

**कोष्टक २ :** शालेय खेळाडू निवड प्रक्रियेसाठी महत्त्वाची निकषांचे विश्लेषण

| महत्वाचे निकष | उत्तरांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| शारीरिक क्षमता | ३१ | १०० |
| कौशल्ये | २६ | ८३.८७ |
| मानसिक तयारी | २३ | ७४.१९ |

संशोधनातील या प्रश्नामध्ये प्रतिसादकर्त्यांना एकाहून अधिक पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध असल्यामुळे, एकूण उत्तरांची संख्या सर्व प्रतिसादकर्त्यांच्या संख्येपेक्षा जास्त आहे. त्यामुळे, टक्केवारीचा विचार करताना एकूण प्रतिसादांची वारंवारिता लक्षात घेण्यात आली आहे

सर्व शाळांमध्ये (१००%) शारीरिक क्षमता हा खेळाडूंच्या निवडीसाठी सर्वात महत्त्वाचा निकष मानला जातो, कारण खेळामध्ये सहनशक्ती, वेग, ताकद आणि लवचिकता महत्त्वाची भूमिका बजावतात. ८३.८७% शाळांमध्ये कौशल्ये महत्त्वाची मानली जातात, ज्यामध्ये खेळाडूंचे तांत्रिक आणि व्यावहारिक प्रावीण्य तपासले जाते. ७४.१९% शाळांमध्ये मानसिक तयारी देखील महत्त्वाची मानली जाते, कारण खेळामध्ये दबावाखाली खेळण्याची क्षमता, एकाग्रता आणि निर्णयक्षमता महत्त्वाची असते. मात्र, फक्त १९.३५% शाळा शैक्षणिक कार्यप्रदर्शनालाही निवड प्रक्रियेत विचारात घेतात, जे दर्शवते की खेळाडूंच्या खेळगुणांवर जास्त भर दिला जातो. ही विश्लेषण दर्शवते की शारीरिक आणि मानसिक तयारी तसेच कौशल्ये हे तीन प्रमुख घटक खेळाडूंच्या निवडीसाठी महत्त्वाचे ठरतात, तर शैक्षणिक निकाल तुलनेने कमी विचारात घेतले जातात.

**कोष्टक ३ :** शालेय खेळाडू निवड प्रक्रियेसाठी प्राथमिक चाचण्यांचे विश्लेषण

| प्राथमिक चाचणी प्रकार | उत्तरांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| फिटनेस चाचणी | २६ | ८३.८७ |
| कौशल्य चाचणी | २३ | ७४.१९ |
| मानसिक तयारी चाचणी | ११ | ३५.४८ |

या प्रश्नामध्येही प्रतिसादकर्त्यांना एकाहून अधिक पर्याय निवडण्याची संधी असल्याने, विश्लेषण करताना एकूण प्रतिसाद संख्येच्या आधारावर टक्केवारी मोजली गेली आहे.

८३.८७% शाळांमध्ये खेळाडूंची निवड करताना फिटनेस चाचणी घेतली जाते, याचा अर्थ खेळाडूंची शारीरिक क्षमता हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो. फिटनेस चाचणीमध्ये गती, सहनशक्ती, ताकद आणि लवचिकता यांसारख्या बाबी तपासल्या जातात. ७४.१९% शाळांमध्ये कौशल्य चाचणी घेतली जाते, म्हणजेच खेळाडूंच्या तांत्रिक आणि खेळाशी संबंधित कौशल्यांचा विचार केला जातो. यामध्ये पासिंग, शूटिंग, ड्रीबलिंग, टॅकलिंग यांसारख्या कौशल्यांचा समावेश असतो. ४५.१६% शाळा सामन्यांमधील कार्यप्रदर्शनालाही महत्त्व देतात, याचा अर्थ काही शाळांमध्ये खेळाडूंच्या वास्तविक सामन्यातील काम गिरीवरून त्यांची गुणवत्ता तपासली जाते. ३५.४८% शाळांमध्ये मानसिक तयारी चाचणी घेतली जाते, म्हणजेच खेळाडूंच्या दबावाखाली काम करण्याच्या क्षमतेवर कमी भर दिला जातो.

**कोष्टक ४ :** शालेय खेळाडू निवड प्रक्रियेत घेतल्या जाणाऱ्या शारीरिक तंदुरुस्ती चाचण्यांचे विश्लेषण

| शारीरिक तंदुरुस्ती चाचणी | उत्तरांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| उंची आणि वजन मापन | २८ | ९०.३२ |
| १०×४ मीटर शटल रन | २७ | ८७.१० |
| स्टँडिंग ब्रॉड जम्प | २६ | ८३.८७ |
| सिट–अप्स (१ मिनिट) | २५ | ८०.६५ |
| सीट अँड रीच | २४ | ७७.४२ |
| ५० मीटर स्प्रिंट | १९ | ६१.२९ |
| मेडिसिन बॉल थ्रो | १६ | ५१.६१ |
| ३० मीटर फ्लाय | १५ | ४८.३९ |
| १०० मीटर स्प्रिंट | १३ | ४१.९४ |
| जर्मन रिले | ६ | १९.३५ |
| खेलो इंडिया फिटनेस बॅटरी | ६ | १९.३५ |
| संबंधित खेळाच्या कौशल्यांनुसार चाचणी घेतली जाते | १ | ३.२३ |

या प्रश्नातही प्रतिसादकर्त्यांना एकाहून अधिक पर्याय निवडण्याची संधी दिली असल्याने, प्रत्येक मूल्यम ापन पद्धतीच्या वारंवारतेवर आधारित टक्केवारी मोजण्यात आली आहे.

**१. मूलभूत शारीरिक मापन चाचण्या**

९०.३२% शाळांमध्ये उंची आणि वजन मापन अनिवार्य आहे, याचा अर्थ खेळाडूंच्या शारीरिक संरचनेवर भर दिला जातो.

७७.४२% शाळा सीट अँड रीच चाचणी घेतात, याचा अर्थ लवचिकतेला महत्त्व दिले जाते.

**२. गती व सहनशक्ती चाचण्या**

१०×४ मीटर शटल रन (८७.१०%) आणि ५० मीटर स्प्रिंट (६१.२९%) या चाचण्या वेग, चपळता आणि सहनशक्ती मोजण्यासाठी वापरल्या जातात.

३० मीटर फ्लाय (४८.३९%) आणि १०० मीटर स्प्रिंट (४१.९४%) काही शाळांमध्ये घेतल्या जातात, जे स्फोटक गतीसाठी उपयुक्त आहेत.

**३. ताकद आणि सहनशक्ती चाचण्या**

स्टैंडिंग ब्रॉड जम्प (८३.८७%) आणि मेडिसिन बॉल थ्रो (५१.६१%) या चाचण्या ताकद आणि स्फोटक शक्ती मोजण्यासाठी घेतल्या जातात.

सिट–अप्स (१ मिनिट) (८०. ६५%) ही चाचणी मुख्यतः स्नायूंच्या सहनशक्तीसाठी घेतली जाते.

**४. विशेष चाचण्या आणि कौशल्याधारित मापन**

१९.३५% शाळांमध्ये खेलो इंडिया फिटनेस बैटरी अंतर्गत चाचण्या घेतल्या जातात, जे शारीरिक क्षमता पूर्णतः मोजण्याची एक सुसंगत पद्धत आहे.

फक्त ३.२३% शाळांमध्ये संबंधित खेळाच्या कौशल्यांनुसार चाचणी घेतली जाते, याचा अर्थ बहुतांश शाळांमध्ये सरासरी शारीरिक निकषांवर भर असतो. शालेय खेळाडूंच्या निवड प्रक्रियेत शारीरिक मापन, वेग, ताकद, लवचिकता आणि सहनशक्ती यावर भर दिला जातो. तथापि, कौशल्याधारित चाचण्यांची संख्या तुलनेने कमी आहे, त्यामुळे भविष्यात खेळविशेष कौशल्य चाचण्यांवर अधिक भर देण्याची गरज आहे.

**कोष्टक ५ :** शालेय खेळाडूंच्या कौशल्य मूल्यांकन पद्धतींचे विश्लेषण

| कौशल्य मूल्यांकन पद्धत | उत्तरांची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|
| खेळ–विशिष्ट चाचणी (उदा. फुटबॉल, बास्केटबॉल) | २२ | ७०.९७ |
| तांत्रिक कौशल्य मूल्यांकन | १३ | ४१.९४ |
| सामन्यांमधील कार्यप्रदर्शन निरीक्षण | २१ | ६७.७४ |

या प्रश्नातही प्रतिसादकर्त्यांना एकाहून अधिक पर्याय निवडण्याची संधी दिली असल्याने, प्रत्येक मूल्यमापन पद्धतीच्या वारंवारतेवर आधारित टक्केवारी मोजण्यात आली आहे.

शालेय खेळाडू निवड प्रक्रियेत खेळ–विशिष्ट चाचण्या (७०.९७%) आणि सामन्यांतील निरीक्षण (६७.७४%) या दोन पद्धती अधिक प्रमाणात वापरल्या जातात, कारण त्या खेळाडूंच्या वास्तविक क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी प्रभावी असतात. मात्र, तांत्रिक कौशल्य मूल्यांकनाची टक्केवारी (४१.९७%) तुलनेने कमी असल्याने या कमी टक्केवारीवरून असे दिसून येते की अनेक शाळांमध्ये तांत्रिक कौशल्यांपेक्षा प्रत्यक्ष खेळातील कामगिरी आणि सराव यावर अधिक भर दिला जातो. भविष्यात या घटकावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

**कोष्टक ६ :** निवड प्रक्रिया किती समावेशक आहे? (१ कमी समावेशक, ५ अत्यंत समावेशक)

| स्केल | उत्तरांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २ (कमी समावेशक) | १ | ३.२% |
| ३ (मध्यम समावेशक) | ३ | ९.७% |
| ४ (समावेशक) | ८ | २५.८% |
| ५ (अत्यंत समावेशक) | १९ | ६१.३% |

बहुतेक प्रतिसादकर्त्यांनी निवड प्रक्रिया समावेशक असल्याचे मान्य केले आहे. एकूण ६१.३% लोकांनी ती अत्यंत समावेशक असल्याचे नमूद केले, तर २५.८% प्रतिसादकर्त्यांनी ती समावेशक असल्याचे सांगितले. त्यामुळे ८७.१% लोक निवड प्रक्रियेबाबत सकारात्मक आहेत.

मात्र, ९.७% प्रतिसादकर्त्यांनी ती तटस्थ असल्याचे म्हटले आहे, तर ३.२% लोकांनी ती कमी समावेशक असल्याचे सांगितले. हे दर्शवते की अजूनही काही लोकांना निवड प्रक्रियेत सुधारणा होण्याची गरज वाटते.

समावेशकता वाढवण्यासाठी निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. स्कोअरिंग प्रणाली लागू करून मूल्यांकन अधिक स्पष्ट करता येईल. तसेच, बाह्य निरीक्षकांचा समावेश केल्याने प्रक्रिया अधिक निष्पक्ष होऊ शकते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल खेळाडूंना संधी देण्यासाठी आवश्यक पावले उचलणे गरजेचे आहे.

## थीमॅटिक विश्लेषण – खेळाडू निवड प्रक्रियेत सुधारणा उपाय

खेळाडू निवड प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, सुधारणा उपाय आणि खेळाडूंच्या अनुभवानुसार मूल्यम ापन करण्यासाठी थीमॅटिक विश्लेषण पद्धत वापरण्यात आली. या अभ्यासासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण (Descriptive Survey) पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संशोधनात विविध शाळांतील शारीरिक शिक्षण शिक्षक, प्रशिक्षक, यांचा प्रतिसाद गोळा करण्यात आले.

सर्वेक्षणामधून मिळालेल्या प्रतिसादांचे गुणात्मक विश्लेषण (Qualitative Analysis) करून काही मुख्य मुद्दे समोर आले. प्रतिसादांचे बारकाईने परीक्षण केल्यावर खेळाडूंच्या निवड प्रक्रियेत सहा महत्त्वाच्या थीम्सची ओळख करण्यात आली. ह्या थीम्स निवड प्रक्रियेतील प्रमुख समस्या आणि उपाय यांना स्पष्ट करतात.

### १. शारीरिक तयारी आणि तंदुरुस्ती (Physical Preparation and Fitness)

आढळलेल्या समस्याः खेळाडूंची शारीरिक क्षमता आणि सहनशक्ती निवड प्रक्रियेत पुरेशा प्रमाणात तपासली जात नाही. अनेक वेळा निवड प्रक्रियेत फक्त कौशल्यांवर भर दिला जातो, त्यामुळे खेळाडूंच्या गती, सहनशक्ती आणि ताकदीबाबत योग्य मूल्यमापन होत नाही. परिणामी, खेळाडू स्पर्धात्मक परिस्थितीत टिकू शकत नाहीत.

सुधारणेसाठी उपायः निवड प्रक्रियेत प्रमाणित शारीरिक चाचण्यांचा (Yo-Yo Test, Sprint Test, Agility Test, Strength Test) समावेश करावा. तसेच, प्रत्येक खेळाडूच्या तंदुरुस्तीचे मूल्यमापन नियमितपणे करावे आणि त्यानुसार वैयक्तिक प्रशिक्षण योजना (Individual Training Program) तयार करावी.

### २. मानसिक तयारी, शिस्त आणि खेळभावना (Mental Preparation, Discipline & Sportsmanship

आढळलेल्या समस्याः उच्च दडपणाच्या परिस्थितीत काही खेळाडू आपली कामगिरी टिकवू शकत नाहीत. स्पर्धांमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आणि मानसिक दबावामुळे चुका होतात. तसेच, काही खेळाडू खेळभावनेच्या तत्त्वांचे पालन करत नाहीत आणि शिस्तीचा अभाव दिसून येतो.

सुधारणेसाठी उपायः खेळाडूंसाठी मानसिक तयारी वाढवण्यासाठी Pressure Handling Drills, Decision-Making Exercises, आणि Mindfulness Techniques यांचा समावेश करावा. संघात खेळभावना वाढवण्यासाठी Fair Play Guidelines लागू करावेत आणि खेळाडूंसाठी शिस्तीचे ठोस निकष (Code of Conduct) निश्चित करावेत.

**३. पारदर्शक निवड प्रक्रिया आणि तटस्थ मूल्यमापन (Transparent Selection & Objective Evaluation)**

आढळलेल्या समस्याः निवड प्रक्रियेत काही वेळा पूर्वग्रहदूषितता (Bias) आढळून येते, ज्याम ुळे योग्य खेळाडूंना संधी मिळत नाही. पारदर्शक गुणांकन प्रणालीचा अभाव असल्यामुळे निवड प्रक्रियेबद्दल विश्वासार्हता राहात नाही.

सुधारणेसाठी उपायः निवड प्रक्रियेत स्पष्ट गुणांकन प्रणाली (Scoring System) लागू करावी, जिथे तांत्रिक कौशल्ये, शारीरिक क्षमता, मानसिक तयारी आणि सामरिक विचारसरणी यांचा योग्य प्रमाणात विचार केला जाईल. निवड प्रक्रियेत बाह्य परीक्षकांचा (External Evaluators) समावेश करून निर्णय प्रक्रिया अधिक न्याय्य आणि विश्वासार्ह केली पाहिजे.

**४. तंत्रज्ञानाचा वापर (Use of Technology & Data-Driven Decision Making)**

आढळलेल्या समस्याः खेळाडूंच्या मूल्यमापनासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव आहे. निवड प्रक्रियेत मानवी निरीक्षणाच्या मर्यादा असतात, त्यामुळे चुका होण्याची शक्यता वाढते.

सुधारणेसाठी उपायः खेळाडूंच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी व्हिडिओ विश्लेषण (Video Analysis), GPS ट्रॅकिंग, आणि डेटा ॲनालिटिक्स (Data Analytics) चा उपयोग करावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने खेळाडूंच्या हालचालींचे आणि खेळातील निर्णय क्षमतेचे अधिक अचूक मूल्यमापन करता येईल.

**५. न्याय्य आणि सर्वसमावेशक निवड प्रक्रिया (Inclusive & Fair Selection Process)**

आढळलेल्या समस्याः ग्रामीण भागातील, अल्पसंख्याक गटातील किंवा अपंग खेळाडूंना समान संधी मिळत नाही. निवड प्रक्रियेत काही वेळा सामाजिक किंवा आर्थिक परिस्थितीमुळे भेदभाव होतो.

सुधारणेसाठी उपायः निवड प्रक्रियेत Open Tryouts ठेवून सर्व खेळाडूंना संधी द्यावी. तसेच, सामाजिक समावेशकता (Social Inclusion) वाढवण्यासाठी अपंग खेळाडूंना विशेष प्रशिक्षण आणि संसाधने उपलब्ध करून द्यावीत.

### ६. खेळाडूंसाठी प्रेरणा आणि आर्थिक मदत (Incentives & Financial Support for Players)

आढळलेल्या समस्याः आर्थिक परिस्थितीमुळे काही खेळाडूंना पुरेशी साधने मिळत नाहीत. तसेच, खेळाडूंना नियमित प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळत नाही.

सुधारणेसाठी उपायः खेळाडूंना शिष्यवृत्ती (Scholarships), आणि प्रोत्साहनपर पुरस्कार (Incentive Awards) देऊन त्यांना प्रेरित करावे. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणाऱ्या योजना राबवाव्यात.

## निष्कर्ष (Conclusion)

वरील विश्लेषणावरून स्पष्ट होते की, निवड प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी अधिक न्याय्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक आहे. खेळाडूंच्या शारीरिक आणि मानसिक तयारीचे मूल्यमापन तांत्रिक पद्धतीने करणे, तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, आणि पारदर्शक निवड प्रक्रिया लागू करणे यामुळे भारतीय क्रीडा क्षेत्र अधिक सक्षम आणि व्यावसायिक बनू शकेल.

## सुधारणा

- वैज्ञानिक निकष वापरणेः निवड प्रक्रियेसाठी शारीरिक, मानसिक आणि तांत्रिक घटकांचा योग्य समतोल राखला जावा.
- डेटा–आधारित मूल्यमापनः निवड प्रक्रियेत सुस्पष्ट आणि न्याव्य निर्णय घेण्यासाठी डेटा ॲनालिटिक्स, परफॉर्मन्स ट्रॅकिंग आणि व्हिडिओ विश्लेषणाचा वापर करावा.
- तंत्रज्ञानाचा समावेशः खेळाडूंच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी स्मार्ट टूल्स, ॲप्स आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म वापरणे आवश्यक आहे.
- मानसिक तयारी आणि प्रशिक्षणः निवड प्रक्रियेत खेळाडूंच्या मानसिक तंदुरुस्तीला अधिक महत्त्व दिले पाहिजे.

## शिफारसी

शालेय स्तरावर खेळाडू निवड प्रक्रिया अधिक वैज्ञानिक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी काही महत्त्वाच्या सुधारणा आवश्यक आहेत. सर्वप्रथम, शारीरिक तंदुरुस्ती, कौशल्ये आणि मानसिक तयारीच्या मूल्यमापनासाठी प्रमाणित चाचण्यांचा अवलंब करावा जेणेकरून खेळाडूंचे संपूर्ण मूल्यमापन करता येईल. निवड प्रक्रियेत फक्त शारीरिक क्षमता नव्हे, तर खेळातील निर्णयक्षमता, स्पर्धात्मक मानसिकता आणि तांत्रिक कौशल्यांचा सुद्धा विचार केला पाहिजे. मानसिक तयारी आणि क्रीडा मानसशास्त्राच्या

मूल्यमापनासाठी विशेष चाचण्या आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन आवश्यक आहे. त्याचबरोबर, निवड प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा समावेश करावा, जसे की वीडिओ विश्लेषण, परफॉर्मन्स

ट्रैकिंग आणि डिजिटल स्कोरिंग प्रणाली, जे खेळाडूंच्या कौशल्यांचे सखोल विश्लेषण करण्यात मदत करू शकते. क्रीडा शिक्षक आणि प्रशिक्षकांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना नवीन वैज्ञानिक पद्धती शिकवणेही महत्त्वाचे आहे, जेणेकरून निवड प्रक्रियेत कोणताही व्यक्तिगत पूर्वग्रह राहणार नाही. खेळाडूंच्या दीर्घकालीन विकासासाठी शाळांनी नियमित चाचण्या, पुनरावलोकन प्रणाली आणि लीडरबोर्ड तयार करून खेळाडूंची प्रगती ट्रॅक करावी. तसेच, निवड प्रक्रियेत सर्व विद्यार्थ्यांना संधी मिळावी यासाठी अधिक समतोल आणि समावेशक दृष्टिकोन अवलंबला पाहिजे. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनुकूल निकष ठेवून त्यांच्यासाठी स्वतंत्र खेळाडू विकास योजना आखल्या जाव्यात. याशिवाय. पालक आणि समाजाच्या सहभागास चालना देण्यासाठी शाळांनी क्रीडा निवडीच्या निकषांबाबत पालकांसाठी माहिती सत्रांचे आयोजन करावे आणि स्थानिक क्रीडा संघटनांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून द्याव्यात. अशा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब केल्यास, खेळाडू निवड प्रक्रिया अधिक प्रभावी, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण होईल, तसेच भारतीय शालेय क्रीडा व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवता येईल.

## संदर्भ सुची

*आहेर, ए. आणि बोडके, व. (२०२२). शारीरिक शिक्षण व क्रीडा मूल्यांकन. पुणेः आदी मीडिया ई–लर्निंग सर्व्हिसेस.*

*कांगणे, ए. (२०२३). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये क्रीडा व क्रीडा एकात्मता. उत्कल रिसर्च हिस्टोरिकल जर्नल, ३६, ७०–७३.*

*कॉलियर, ड. (२०११). शारीरिक शिक्षणाचे मूल्य वाढवणेः मूल्यांकनाची भूमिका. जर्नल ऑफ फिजिकल एज्युकेशन, रिक्रिएशन आणि डान्स, ८२(७), ३८–४१. doi:https://doi.org/10.1080/07303084.2011.10598656*

*गोस्वामी, व., पांडे, आ., आणि विकस, आणि नंदा, आ. (२०२१). भारतीय शाळांमध्ये क्रीडा धोरणाच्या अंमलबजावणीवर अभ्यास. इंटरनॅशनल जर्नल ऑफ रिसर्च पेडगॉजी अँड टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन अँड मूव्हमेंट सायन्स, ३(१), १७–२८. Retrieved from https://ijems.net/index.php/ijem/article/view/81*

*पुर्णोमो, ए., कुसुमा, ड., रुसदियावान, ए. (२०२१). सीतूबोंडो जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये क्रीडा प्रतिभा ओळखणे. ॲडव्हान्सेस इन सोशल, एज्युकेशन अँड ह्यूमनिटीज रिसर्च, ६१८, ३८२–३८७. Retrieved from https://www.atlantis press.com/article/125967505.pdf*

*राणी, ए., भल्ला, ए. (२०२१). भारतातील क्रीडा शिक्षणः एक आधुनिक दृष्टिकोन. इंटरनॅशनल जर्नल ऑफ योगा, ह्युमन मूव्हमेंट अँड स्पोर्ट्स सायन्सेस, ६ (१), ९८–१०२. Retrieved from https://www.theyogicjournal.com/pdf/2021/vol6issue1/PartB/6-137-133.pdf*

*स्लेड, क., जोवेट, ए.. रिंड, ड. (२०२४). उच्च कामगिरीच्या क्रीडा क्षेत्रात निवड–निवडीसाठी मार्गदर्शक त्त्वेाा विकसित करणेः एक डेल्फी अभ्यास. जर्नल ऑफ स्पोर्ट्स सायन्स, ४२ (१३), १२०९–१२२३. doi:https://doi.org/10.1080/02640414.2024.2387968*

*काळे, अ. (२०२०, ०७ २७). शारीरिक शिक्षण. Retrieved from विकासपीडियाः*

*https://education.vikaspedia.in/viewcontent/education/childrens-corner/91694793393e91a947*

*92a94d93091593e930/93693e93094093093f915*

*93693f91594d937923?lgn=mr*

*आहेर, श. (२००९). शारीरिक शिक्षण मापन आणि मूल्यमापन. पुणेः डायमंड पब्लिकेशन्स.*

*रामराजे, र. (२०२२, ०७ २१). शारीरिक शिक्षण. Retrieved from मराठी विश्वकोशः https://marathivishwakosh.org/61081/*

*कांगणे, स., आहेर, श., महाडिक, श., ढेंगळे, द. (जून २०२०). प्रतिभा प्रक्रिया आणि कार्यपद्धती. सेट/नेट शारीरिक शिक्षण पेपर २ (. ७.३२७.३४). पुणेः निर्मल प्रकाशन.*

*मलिक, क. (२०२४). क्रिकेट विरुद्ध इतर खेळः भारताची कमी पदकसंख्या खेळाडूंना दुर्लक्ष का? व्हिडिओपॉडकास्ट. यूट्यूब.: .https://youtu.be/nSiIoLHWqz8?si=QAoUe tKoC9Y19uYu*

*अरनॉट, आर. बी., आणि गेनर्स, सी. (१९८४). स्पोर्टसेलेक्शन. लंडनः पेलहॅम बुक्स.*

*झाओ, जे., शियांग, सी., कमाल्डेन, टी. एफ. टी., डोंग, डब्ल्यू., लुओ, एच., आणि इस्माईल, एन. (२०२४). क्रीडा क्षेत्रात प्रतिभा शोध, ओळख, विकास आणि निवडीतील फरक आणि संबंधः एक प्रणालीबद्ध आढावा. हेलीयन, https://doi.org/10.1016/j.heliyon.2024.e27543*

*कौतिन्हो, पी., मेश्क्रिटा, आय., आणि फोन्सेका, ए. एम. (२०१६). क्रीडा क्षेत्रातील प्रतिभा विकासः तज्ज्ञ कामगिरीसाठी मार्गांचा समीक्षात्मक आढावा. आंतरराष्ट्रीय क्रीडा विज्ञान आणि कोचिंग जर्नल, ११(२), २७९–२९३. https://doi.org/10.1177/1747954116637499*

*नून, एम. आर., जेम्स, आर. एस., क्लार्क, एन. डी., अकुबाट, आय., आणि थाके, सी. डी. (२०१५). इंग्रजी उच्च गुणवत्ता असलेल्या युवा फुटबॉल खेळाडूंच्या एक पूर्ण सिझनमधील कल्याण आणि शारीरिक कामगिरीच्या धारणा. जर्नल ऑफ स्पोर्ट्स सायन्स, ३३, २१०६–२११५. https://doi.org/10.1080/02640414.2015.1081393*

*टिल, के., बाकर, जे. (२०२०). क्रीडेत टॅलंट आयडेंटिफिकेशन आणि विकास सुलभ करण्याच्या आव्हानांसह साध्य उपाय. फ्रंटियर्स इन सायकोलॉजी, ११. ६६४. https://doi.org/10.3389/fpsyg.2020.00664*

*मुनीरोग्लू, एस., & सुबक, ई. (२०१८). क्रीडांमध्ये कौशल्य निवडीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा आढावा. रिसर्च & इन्व्हेस्टीगेशन्स इन स्पोर्ट्स ://./१०.३१०३१/.२०१८.०३.०००५६१ मेडिसिन, ३(३). https://doi.org/10.31031/RISM.2018.03.000561*